Rotary

CREATE HOPE in the WORLD

R I District 3131
# ROTARY CLUB OF PUNE SPORTS CITY

Sports Wheel

Bulletin
2023-2024

Year : 31st Issue No.5
Date :- February 2024



President : Rtn. Ashutosh Dubey
Ashutosh.ihsb@gmail.com

Secretary : Rtn. Sushrut Sardesai
sardesaisv@yahoo.co.uk

Editor : Ann. Veena Deshmukh
veenadeshmukh0907@gmail.com

Designer : Rtn. Alka Rode
alka.rode5@gmail.com


## सिम्बायोसिस रुग्णालयाला 'रोटरी'तर्फे १२ डायलिसिस मशिन

पुणे, ता. १० : 'रोटरी स्पोर्ट्स सिटी रोटरी ट्रस्ट'तर्फे लवळे येथील सिम्बायोसिस रुग्णालयाला १२ डायलिसिस मशिन देण्यात आल्या. या संपूर्ण प्रकल्पाचा खर्च ८५ लाख रुपये असल्याची माहिती रोटरी स्पोर्ट्स सिटीतर्फे देण्यात आली.

सिम्बायोसिस रुग्णालयात सध्या दर महिन्याला ६०० रुग्ण डायलिसिससाठी येतात. त्यांची संख्या या मशिन्स दिल्याने एक हजार ८००पर्यंत वाढेल. गंभीर मूत्रपिंड विकाराच्या रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यातील बहुतांश रुग्ण सरकारच्या वेगवेगळ्या योजनांमधून मोफत उपचार घेतात. या मशिन्स मिळाल्यानंतर रुग्णालयाने डायलिसिस केंद्रातील पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या वाढविली आहे.

रोटरी क्लब पुणे स्पोर्ट्स सिटीला चार रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट्स, इंटरनॅशनल रोटरी पार्टनर, रोटरी क्लब कल्व्हर सिटी यांचा समावेश असलेल्या विविध प्रकारच्या देणगीदारांकडून ८५ लाख रुपयांचे जागतिक अनुदान एकत्रित करण्यात यश आले. रोटेरियन नसलेले रामकृष्ण राव, होडेक व्हायब्रेशन टेक्नॉलॉजीज, रोटरी क्लब मद्रास, पुणे स्पोर्ट्स सिटी ट्रस्ट यांच्या वतीने सिम्बायोसिस रुग्णालयाला अत्याधुनिक डायलिसिस मशिन्स हस्तांतरित करण्यात आल्या आहेत.



लवळे : 'रोटरी स्पोर्ट्स सिटी रोटरी ट्रस्ट'तर्फे सिम्बायोसिस रुग्णालयाला १२ डायलिसीस मशिन्स हस्तांतरित केल्या आहेत.

...वैद्यकीय आणि इतर विभागांवर कारवाई ...र्ई झाल्यानंतर पुन्हा सेवा सुरू होतात. ... कारवाई होणे गरजेचे आहे. ... विकास सेवा ...

...सचिव सचिन ठोंबरे, सदस्य विशाल तोडे, शशिकांत तोडे, ज्ञानेश्वर तोडे, जयवंत तोडे, मुख्याध्यापक अंकुश बोऱ्हाडे, अशोक सुंबे उपस्थित होते.

## साने गुरुजी रुग्णालयाला रोटरीतर्फे नेत्रोपचार उपकरणे



पुणे, ता. १७ : स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने रोटरी पुणे स्पोर्ट्स सिटीच्या वतीने हडपसर येथील साने गुरुजी रुग्णालयाला ४१ लाख ४० हजार रुपये किमतीचे अद्ययावत नेत्रोपचार उपकरणे भेट देण्यात आली. यामध्ये सर्जिकल मायक्रोस्कोप, अप्लायन्स फेको इमल्सिफिकेशन सिस्टिम, डिजिटल इमेजिंग स्लिट लॅम्प सिस्टिम, एलईडी डिजिटल व्हिज्युअल चार्ट आदी प्रमुख अत्याधुनिक उपकरणांचा समावेश आहे.

रोटरी फाउंडेशन, रोटरी पुणे स्पोर्ट्स सिटी आणि युनायटेड किंगडममधील (यूके) रोटरी क्लब यांनी संयुक्तपणे ही उपकरणे उपलब्ध करून दिली. त्यामुळे मोतीबिंदू, काचबिंदू, व्हिट्रिओरेटिनल (डोळ्यातील पडदा सरकणे), ऑर्बिटल मांसलव्या नेत्ररोग शस्त्रक्रिया सक्षमपणे करता येतील. अन्य उपकरणांमध्ये वेगळा वापरणारे ऑपरेटिंग टेबल, सर्जन स्टूल, फेको हॅंडपीस, टिप्स आणि ट्रॉलीज आदींचा समावेश असल्याचे रोटरी पुणे स्पोर्ट्स सिटीचे संदेश सावंत यांनी सांगितले.

सध्या या रुग्णालयामधील बाह्यरुग्ण विभागात वर्षाला सहा हजार रुग्णांवर उपचार केले जातात. त्यापैकी सुमारे ६०० रुग्णांची नेत्र शस्त्रक्रिया करावी लागते. या उपकरणांमुळे बाह्यरुग्ण विभागातील सध्याच्या रुग्णसंख्येच्या प्रमाणात दुपटीहून अधिक रुग्णांवर उपचार करणे आणि त्याहून अधिक नेत्ररोग शस्त्रक्रिया करणे शक्य होईल.

## दिव्यांगांमध्ये प्रेरणा निर्माण करण्यासाठी सायक्लोथॉन

पुणे, ता. २४ : अपंगत्वामुळे जीवन जगण्यात काही अडथळे येत असले तरी तुम्ही इच्छाशक्तीच्या जोरावर अनेक बाबी साध्य करू शकता, असा संदेश देण्यासाठी रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि विविध रोटरी क्लब यांच्यावतीने सायक्लोथॉन हा सायकलिंगचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या सायक्लोथॉनचे वैशिष्ट्य म्हणजे यात जर्मनीवरून आलेले स्टीफन वूरमन्स सहभागी झाले आहेत.

दुचाकीच्या अपघातात कमरेखालील शरीर निकामी झालेले स्टीफन हाताने पॅडल मारत ही सायक्लोथॉन पूर्ण करणार आहेत. वाईवरून सुरू झालेली ही सायक्लोथॉन नाशिकमार्गे मुंबईत संपणार आहे. २३ ते २७ जानेवारी दरम्यान ५१० किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला जाणार आहे.

मंगळवारी (ता. २३) सकाळी वाईवरून निघालेले स्टीफन दुपारी पुण्यात पोहोचले. त्यानंतर त्यांनी बालकल्याणमधील मुलांना भेट देत त्यांच्याशी संवाद साधला. तसेच त्यांनी दिव्यांग सैनिकांची काळजी घेणाऱ्या क्वीन मेरी टेक्निकल इन्स्टिट्यूटला भेट दिली. बुधवारी (ता. २४) पुढील प्रवास सुरू करणार आहे, अशी माहिती रोटरी क्लबकडून देण्यात आली.

''हाताने पॅडल मारत स्टीफन हे प्रत्येक तासाला साधारण २० किलोमीटरचा प्रवास करीत आहेत. जीवनातील कठीण आव्हानांवर मात कशी करावी, याचे चांगले उदाहरण असलेले स्टीफन या प्रवासातून अनेकांसाठी प्रेरणादायी ठरतील. त्यामुळे सायक्लोथॉन ही केवळ शर्यत नसून मानवी धैर्याचा पुरावा देणारा प्रवास आहे.'' असे रोटरी क्लबचे नितीन जोशी यांनी सांगितले.



खडकी : क्वीन मेरी टेक्निकल इन्स्टिट्यूटमधील पदाधिकाऱ्यांनी स्टीफन वूरमन्स यांचे स्वागत केले.

> मला सायकलिंगची आवड आहे. त्या आवडीला रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टने साथ दिली. या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींमध्ये प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. वाईतून ९६ किलोमीटरचा प्रवास करून मी पुण्यात आलो आहे.
> — स्टीफन वूरमन्स, सायकलस्वार